प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कार्यालय
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर
पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर – ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२-२५५६९१६ इ-मेल-**apccfnodal@mahaforest.gov.in**

क्रमांक कक्ष– १७/ नोडल/नागपूर/आय.डी. १३७५७/२०६४ /२०२२-२३
नागपूर – ४४० ००१, दिनांक १८/११/२०२२

विषय – Proposal for diversion of 0.34 ha. forest land for rehabilitation and up gradation of Nagpur-Warud National Highway (NH-353 J) from existing KM 60+100 (End of Katol bypass) to 101+085 (Warud up to Joint Junction) to two lane with paved shoulders in the Maharashtra on EPC Mode.

संदर्भ – मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१०/जमीन/प्र.क्र.११३६/२०२२-२३/ १२३१, दि. १०/११/२०२२

संदर्भिय पत्रान्वये वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत उपरोक्त विषयाचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता, खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास येतात.

१) Forest & Non-Forest चे Area Statement (गाव, कक्ष क्रमांक, गट/सर्व्हे क्रमांक निहाय क्षेत्र) उपवनसंरक्षक यांचे स्वाक्षरीसह सादर करावे.

२) प्रस्तावित क्षेत्र वन्यजीव अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानांपासून किती अंतरावर आहे, याबाबतचे अंतर प्रमाणपत्रावर स्पष्टपणे नमुद करावे. तसेच सदरील बाब ठळक रंगाने Topo Sheet नकाशावर दर्शवावी.

३) Net Present Value प्रमाणपत्र मुख्य वनसंरक्षक यांच्या प्रतिस्वाक्षरीने सादर करावे.

४) Geo-reference Map/Geo digital map, Index map प्रस्तावासोबत जोडलेला नाही. Geo-reference Map मध्ये वनक्षेत्र, वनेत्तर क्षेत्र वेगवेगळया रंगाने दर्शविण्यात यावे. तसेच नकाशावर कक्ष क्रमांक सिमा स्पष्टपणे चिन्हांकित करावी.

५) प्रस्तावातील क्षेत्राची स्थिती अधिग्रहीत केलेले झुडपी जंगल/संरक्षित वनाबाबत असल्याने शासन/केंद्र शासनाने याबाबत प्रसिध्द केलेले राजपत्राची प्रत सादर करावी.

६) प्रस्तावित क्षेत्राचे KML मध्ये properties दिसून येत नाही. KML File मध्ये Starting point and Ending point नमुद करावे. तसेच सर्व्हे क्रमांक, गाव व कक्ष निहाय वनाची सिमा दर्शविण्यांत यावी.

७) पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राची KML File सादर करावी.

८) पर्यायी वनीकरणाकरीता निवड करण्यांत आलेल्या क्षेत्राची गुगल सॅटेलाईट इमेज सादर करण्यांत यावी.

९) प्रस्तावित पर्यायी वनीकरणाकरीता निवड केलेल्या मौजा चाकडोह गावाच्या नकाशात सर्व्हे क्र. १० एकूण आराजी २.०६ हेक्टर पैकी १.०० हेक्टर क्षेत्र दर्शवून उपवनसंरक्षक यांचे स्वाक्षरीसह प्रस्तावासोबत जोडावे.

१०) प्रस्तावित केलेल्या पर्यायी वनीकरणाकरीता निवड केलेल्या क्षेत्राचा गाव नकाशा व ७/१२ उतारा जोडावा.

तरी उपरोक्त त्रुटीची पुर्तता करुन परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. सदर प्रस्तावाच्या २ प्रती यासोबत परत करण्यांत येत आहे.

सहपत्र – वरीलप्रमाणे

18/11/22

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
म.रा. नागपूर

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर

प्रतिलिपी - उपवनसंरक्षक (प्रा.) नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

प्रतिलिपी –कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, बंगला क्र. ३९/१, सिव्हील लाईन, नागपूर यांना माहिती करीता अग्रेषित.